स्वच्छ गांव !

निर्मल ग्राम !!

सुंदर गांव !!!



गट ग्राम पंचायत वेळा (हरिश्चंद्र)

पंचायत समिती नागपूर, ता.जि. नागपूर



सरपंच
श्री. सचिन कृष्णराव इंगळे

उपसरपंच
श्री. आकाश ज्ञानेश्वर पिसार

सचिव
श्री. सचिन बी. खोडे

सदस्य गण

श्री. प्रभाकर बापुराव काळबांडे

सौ. सोनाली सतिश सेलकर

सौ. कविता पिंटु ठाकरे

सौ. शालिनी राजु थुल

सौ. माधुरी पुरुषोत्तम बोधनकर

सौ. प्रियंका छत्रपाल पाटील

जावक क्र.
दिनांक

ग्रा. पं. वेळा (हरिश्चंद्र)
आ./जा.२३६
दि.१५/१२/२०२१
पं.स.त.जि. नागपूर

प्रती,

मे. महालक्ष्मी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे
श्री मोरेश्वर चिंतामण सोर
रा. प्लॉट क्र. ४७३ तिरंगा चौक, नेहरू नगर,
नागपुर -१८

विषय: मौजा गोटाळ पांजरी ख.क्र. ५०/५ मधील मंजूर रहिवासी ले आऊट अभिन्यास हस्तांतरित करण्याबाबत.

संदर्भ: १) मे. महालक्ष्मी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे श्री मोरेश्वर चिंतामण सोर यांचा दिनांक १३/१०/२०२१ रोजीचा अर्ज.
२) मा. कार्यकारी अभियंता (मेट्रो) विभाग सदर नागपुर व मा. सहायक अभियंता (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना ग्रा. पं. चे पत्र जा. क्र १८६ दिनांक १०/११/२०२१ अन्वये.
३) मा.सहायक अभियंता-१ (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. सहा. अभि.(द) / ना.म.प्र.वि.प्रा. १८१ दिनांक २५/११/२०२१ अन्वये.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये कळविण्यात येते की आपल्या अर्जानुसार व मा. सहायक अभियंता-१ (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र. सहा. अभि.(द) / ना.म.प्र.वि.प्रा. १८१ दिनांक २५/११/२०२१ रोजीचे पत्रानुसार मौजा गोटाळ पांजरी ख.क्र. ५०/५ आराजी ७४५१.११९ चौ. मीटर (०.७४५१११९ हे.आर) क्षेत्रफळात मे. महालक्ष्मी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे श्री मोरेश्वर चिंतामण सोर यांनी अभिन्यासातील विकास करारनामा मधील अट क्र. १७ नुसार विकासकाने अभिन्यासातील मलवाहिका, पर्जन्यवाहिका , पिण्याचे पाण्याची वाहिनी , सीमेंट कॉक्रीट रस्ते , खुल्या जागेस संरक्षण भिंतीचे बांधकाम व मल –जल शुद्धीकरण संयंत्राचे बांधकाम मंजूर विकास नकाशानुसार पूर्ण केलेले आहे तथापी मलजल शुद्धीकरण संयंत्राचे , या अभिन्यासात सदयास्थितीत रहिवाशी नसल्याने विकासकाने भविष्यात देखभाल व दुरूस्ती करण्याबाबत दिनांक २५/११/२०२१ चे हमीपत्र सादर केलेले आहे. असे पत्रात नमूद आहे. वरील विकास कामे अर्जदाराने पूर्ण केल्यामुळे व ना. म. प्र. वि. प्रा. विभागीय कार्यालय-१ दक्षिण यांचे पत्राचे आधीन राहून सदर विकास कामाची देखभाल व दुरुस्ती यापुढे ग्रा.पं. करण्यास तयार आहे. पण तत्पूर्वी पूर्ण भूखंडावर कर आकारणी करून देण्याची जबाबदारी अर्जदार / ले आऊट मालकाची राहील. जोपर्यंत प्लॉटधारकाचे नावाने टॅक्स लागत नाही तोपर्यंत ले आऊट धारकाचेच नावाने टॅक्स राहील व ले आऊट धारकानांच यासमोर टॅक्स भरणा करावा लागेल. व भविष्यात सर्व प्लॉटधारकाचे टॅक्स लावून देणे लेआऊट धारकावर बंधनकारक राहील तसेच ले आऊट मध्ये मोक्यावर पूर्ण वसाहत तयार होईपर्यन्त व लेआऊट मालक यांनी सादर केलेल्या १०० रुपयेचा मुद्रांक नंबर YE ९२०९७१ दिनांक १४/०७/२०२१ चा खरेदी दिनांक २०/०७/२०२१ चा स्टॅम्प पेपरवर लिहून दिलेल्या हमीपत्रात नमूद बाबीची देखभाल व दुरूस्ती ले आऊट मालकाची राहील. तसेच ना. म. प्र. वि. प्रा. यांचे पत्रात नमूद बाबी व्यतिरिक्त इतर बाबी आढळल्यास व भविष्यात वाद निर्माण झाल्यास ती सोडविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अर्जदार / ले आऊट धारक यांची राहील. ग्राम पंचायतची जबाबदारी राहणार नाही.

वरील अटी व शर्तींच्या आधीन राहून व विविध शासकीय विभागाच्या अटी व शर्तींच्या आधीन राहून ग्राम पंचायत सदर लेआऊट अभिन्यास हस्तांतरित करण्यास तयार आहे.

करिता सविनय महितीस सादर.

सरपंच / सचिव
ग्रामपंचायत वेळा (हरिश्चंद्र)
पं. स. नागपूर.

प्रोसीडिंग बुक (कारवाई बुक)

ग्रामपंचायत – वेळा (हरिश्चंद्र) तहसील – नागपूर जिल्हा – नागपूर सन २०२१ -२२

ग्रा. पं. वेळा (हरिश्चंद्र)
आ./जा. २३६
दि. १५/१२/२०२१
ता. जि. नागपूर

नंबर सभेच्या दिनांक व तारीख	हजर सभासदांची नावे	ठरावाच्या मसुदा	सूचक / अनुमोदन	थोडक्यात चर्चा	तर्फेची संख्या व सही	विरोधकांची संख्या व सही	तटस्थाची संख्या व सही	ठराव पास किंवा नापास	सर्वसाधारण मत	अधिकाऱ्यांची सही
७/२ २६/११/२०२१	श्री सचिन कृष्णराव इंगळे सरपंच व हजेरी रजिस्टर प्रमाणे उपस्थित ग्रा.पं.सदस्य	ठराव क्र. ७/२ येणाऱ्या अर्जावर विचार विनिमय करणे.		मासिक सभा दिनांक – २६/११/२०२१ वेळ - दुपारी १२:०० वाजता ठराव क्र. ७/२: मौजा गोटाळ पांजरी ख. क्र. ५०/५ मधील मंजूर रहिवास्याचे अभिन्यास हस्तांतरण करण्याबाबत अर्ज व मा.सहायक अभियंता -१ (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्राचे अनुषंगाने. **खुलासा** :- वरील विषयानुसार आजच्या सभेत मेमहालक्ष्मी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे श्री मोरेश्वर चिंतामण . सोर यांचा अर्ज प्राप्त झाला असून यांचा अर्जात नमूद मौजा गोटाळ पांजरी ख.क्र. ५०/५ ले आउट मधील मंजूर रहिवासी अभिन्यास हस्तांतरण करण्याबाबत अर्ज प्राप्त झाला असून सदर अर्जाचे अनुषंगाने मा.कार्यकारी अभियंता (मेट्रो) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सदर नागपुर तसेच सहायक अभियंता (द) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हनुमान नगर झोन नागपूर यांना मौजा गोटाळ पांजरी ख.क्र. ५०/५ या ले आऊट मधील आपल्या सोबत केलेल्या करारनामा क्र. E.E./NMRDA/Agg/४४७ दि. २२/०७/२०२१ नुसार केलेल्या करारनामाप्रमाणे सुविधा पूर्ण झाले की कसे ? याबाबत अभिप्राय मागविण्याबाबत दिनांक १०/११/२०२१ रोजी ग्रा.पं. ने पत्र दिले होते. व मा.सहायक अभियंता-१ (दक्षिण) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे पत्र क्र.सहा .अभि/ (द). ना.म.प्र.वि.प्रा. १८१ दिनांक २५/११/२०२१ रोजीचे पत्राची सत्यप्रत ग्राम पंचायतला मे . महालक्ष्मी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे श्री मोरेश्वर चिंतामण सोर यांचे मार्फत प्राप्त झाले. सदर अर्जाचे व ना.म.प्र.वि.प्रा. यांचे पत्राचे अनुषंगाने ग्राम पंचायत मासिक सभा दिनांक २६/११/२०२१ ठराव क्र. ७/२ अन्वये सदर अर्जाचे व पत्राचे मासिक सभेमध्ये वाचन करण्यात आले. व पत्रात नमूद आहे की मौजा गोटाळ पांजरी ख.क्र. ५०/५ लेआउट मध्ये विकास कामे करण्याबाबत नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोबत झालेल्या विकास करारनामा मधील अट क्र. १७ नुसार विकासकाने अभिन्यासातील मलवाहिका, पर्जन्यवाहिका , पिण्याचे पाण्याची वाहिनी , सीमेंट कॉक्रीट रस्ते , खुल्या जागेस सुरक्षा भिंतीचे बांधकाम व मल – जल शुद्धीकरण संयंत्राचे बांधकाम मंजूर विकास नकाशानुसार पूर्ण केलेले आहे. सदर पत्राचे अधीन राहून पत्रात नमूद बाबीला काम पूर्ण झाले असे मानून शासनाचे अटी व शर्तीच्या आधीन राहून कामाची देखभाल व दुरुस्ती हस्तांतरणानंतर ग्रा.पं. करण्यास तयार आहे. तत्पूर्वी पूर्ण भूखंडावर कर आकारणी करण्यात यावी व जोपर्यंत प्लॉट धारकाचे नावाने टॅक्स लागत नाही तोपर्यंत ले आऊट धारकाचेच नावाने टॅक्स राहील व ले आऊट धारकांनाच टॅक्स भरणा करावा लागेल. तसेच ले आऊट मध्ये मोक्यावर पूर्ण वसाहत तयार होईपर्यन्त व लेआऊट मालक यांनी सादर केलेल्या १०० रुपयेचा मुद्रांक नंबर YE ९२०९७१ दिनांक १४/०७/२०२१ चा खरेदी दिनांक २०/०७/२०२१ चा स्टॅम्प पेपरवर लिहून दिलेला हमीपत्रात नमूद बाबीची देखभाल व दुरूस्ती ले आऊट मालकाची राहील. तसेच ना.म.प्र.वि.प्रा. यांचे पत्रात नमूद बाबी व्यतिरिक्त इतर बाबी आढळल्यास व भविष्यात अभिन्यासामध्ये फ्लॅट स्कीम तयार झाल्या व त्याबाबत काही तक्रारी निर्माण झाल्यास ,भविष्यात वाद निर्माण झाल्यास ती सोडविण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अर्जदार /ले आऊट धारक यांची राहील. व त्यांनी ले आऊट मध्ये रहिवास्यांचा आवश्यकतेनुसार / गरजेनुसार नवीन पद्धतीने स्वखर्चाने कामे करून द्यावे लागेल. असे सभेत ठरवून ठराव सर्वानुमते मंजूर.	--	--	--	पास	--	

सरपंच / सचिव
ग्रामपंचायत वेळा (हरिश्चंद्र)
पं. स. नागपूर.